# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः13.05.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीसाठी चौथ्या टप्प्यातलं मतदान सुरू
2. महाराष्ट्रातल्या 298 उमेदवारांसाठी 11 मतदारसंघात 29 हजार 284 मतदान केंद्रांवर मतदान सुरू
3. आयएनएस किल्तान, व्हिएतनाममधील 'कॅम-रान' खाडी इथे दाखल
4. तमिळनाडूतील नागपट्टणम इथले कम्युनिस्ट पक्षाचे खासदार एम सेलवारसू यांचं निधन आणि
5. इंडोनेशिया, अफगाणिस्तान आणि ब्राझीलमध्ये पुराची आपत्ती तर, मेक्सिकोला भूकंपाचा धक्का

**चौथा टप्पा**

2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान सुरू झालं आहे. नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या 96 जागांसाठी आज हे मतदान होत आहे. आंध्र प्रदेशच्या 25 जागा, तेलंगणाच्या 17 जागा, उत्तर प्रदेशच्या 13, महाराष्ट्राच्या 11, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालच्या प्रत्येकी आठ, बिहारच्या 5 जागा, झारखंड आणि ओडिशाच्या प्रत्येकी 4 जागा आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या एका जागेकरता या टप्प्यात मतदान होत आहे.

मतदान सकाळी 7 वाजता सुरू झालं असून ते संध्याकाळी 6 वाजता संपेल. मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी तेलंगणातील 17 मतदारसंघातील काही ठिकाणी मतदानाची वेळ वाढवण्यात आल्याचं आयोगानं म्हटलं आहे. या टप्प्यात 8 कोटी 97 लाख पुरुष आणि 8 कोटी 73 लाख महिला मतदारांसह एकंदर 17 कोटी 70 लाखांहून अधिक मतदार मतदानासाठी पात्र आहेत. लोकसभा निवडणुकीच्या आजच्या चौथ्या टप्प्यासाठी एकूण 1717 उमेदवार रिंगणात असून अनेक प्रमुख उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएम मध्ये बंद केलं जाईल. यामध्ये केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते गिरिराज सिंह, अर्जुन मुंडा, जी किशन रेड्डी, अजय कुमार मिश्रा; जेडीयूचे राजीव रंजन सिंह; समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव; काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी; टीएमसीचे महुआ मोईत्रा आणि शत्रुघ्न सिन्हा आणि एआय-एमआयएम चे असदुद्दीन ओवेसी या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे.

**मतदान**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदानाला सकाळी सात वाजल्यापासून सुरुवात झाली. पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर; शिर्डी, नंदुरबार, जळगाव; रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीड या 11 मतदारसंघांचा यामध्ये समावेश असून एकंदर 29 हजार 284 मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया सुरू आहे. या टप्प्यात राज्यातल्या एकंदर 298 उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रांमध्ये बंद होणार आहे;

त्यामध्ये केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, अमोल कोल्हे; शिवाजीराव आढळराव पाटील, सुजय विखे पाटील; यांचा समावेश आहे. मतदानाची वेळ संध्याकाळी सहा वाजेपर्यंत आहे.

मतदान प्रक्रिया सुरळितपणे पार पडावी यासाठी सर्वच मतदारसंघांमध्ये जय्यत तयारी करण्यात आली असून सुरक्षा व्यवस्थेसाठी सर्व ठिकाणी पोलीसांसह अन्य सुरक्षा दल कर्मचाऱ्यांची पथकंही नियुक्त करण्यात आली आहेत. चौथ्या टप्प्यातील 11 लोकसभा मतदारसंघांमधील मतदानासाठी निवडणूक आयोगानं एकंदर 53 हजार 959 बॅलेट युनिट, 23 हजार 284 कंट्रोल युनिट आणि 23 हजार 284 व्हीव्हीपॅट मशीन उपलब्ध करून दिली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.

**आयएनएस विक्रांत**

भारतीय नौदलाची युद्धनौका 'आयएनएस किल्तान' काल व्हिएतनाममधील 'कॅम-रान' खाडी इथे पोहोचली. व्हिएतनाम पीपल्स नेव्ही आणि भारतीय दूतावासानं तिचं जोरदार स्वागत केलं. आयएनएस किल्तानची ही भेट भारतीय नौदलाच्या पूर्वेकडील ताफा व्यवस्थापन आणि तैनातीचा एक भाग असून, दोन्ही सागरी राष्ट्रांमधील दीर्घकालीन मैत्री आणि सहकार्य अधिक दृढ करणारी आहे. भारत आणि व्हिएतनाममध्ये सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी असून या संबंधांना पुढे नेण्यासाठी भारतीय नौदलाच्या किल्तानची, ही भेट व्यवसायिक संवाद, सामाजिक देवाणघेवाण आणि दोन्ही नौदलाची सामायिक मूल्यं प्रतिबिंबित करणारी आहे. भारतीय नौदल आणि व्हिएतनाम पीपल्स नेव्ही यांच्या समुद्रातील संयुक्त सरावाने या भेटीचा समारोप होईल. यामुळे या क्षेत्रातली उभय देशांची कार्यक्षमता आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण वाढेल. INS किल्तान ही पाणबुडीविरोधी शस्त्रसज्ज अशी स्वदेशी संरक्षक युद्धनौका आहे.

**रशिया-मंत्रीमंडळ बदल**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी त्यांचे दीर्घकालीन सहकारी सर्गेई शोइगु यांना देशाचे नवे संरक्षण मंत्री म्हणून नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. माजी उपपंतप्रधान आंद्रेई बेलोसोव्ह यांच्या जागी शोईगु यांची नियुक्ती होणार आहे. सुरक्षा परिषदेच्या सचिवपदी सक्षम नेता असण्याच्या दृष्टीने, तसंच सकल देशांतर्गत उत्पन्नात अर्थात जीडीपी चं 7 पूर्णांक 4 दशांश टक्क्यांचं उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने हे बदल प्रस्तावित करण्यात आले आहेत. शोईगु यांच्याकडे लष्करी तसंच औद्योगिक संकुलाच्या जबाबदाऱ्याही सोपवण्यात येणार आहेत.

**सिक्कीम**

ऑपरेशन सद्भावनाअंतर्गत, भारतीय सैन्याचं त्रिशक्ती कोर उत्तर सिक्कीमच्या नागा आणि रंगरंग गावांमधील दुर्गम समुदायांना सातत्यानं मदत करत आहेत. हिमनदी सरोवराच्या विध्वंसक पुरानंतर, या कोअरने अत्यावश्यक मदत सामग्रीचं वाटप केल्यामुळे गावकऱ्यांना त्याचा लाभ झाला आणि आव्हानात्मक काळात एकतेचं प्रतीक पाहायला मिळालं. कोरनं एका वैद्यकीय शिबिरात 150 हून अधिक गंभीर रुग्णांना आरोग्य सेवा प्रदान केली, तर स्थानिक तरुणांना अग्निवीर योजनेंतर्गत शैक्षणिक प्रवाहात आणत सक्षमीकरण आणि उज्ज्वल भविष्याचा प्रचार केला. मानवतावादी दृष्टिकोनातून केलेले हे प्रयत्न, समुदायाच्या विकासाला चालना देण्यासाठी, सीमावर्ती लोकसंख्येशी असलेले बंध भक्कम करण्यासाठी, तसंच सीमावर्ती भागात शाश्वत सुसंवाद आणि एकता निश्चित करण्यासाठी लष्कराच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकणारे आहेत.

**अरुणाचल प्रदेश**

आंतरराष्ट्रीय वृक्षआरोग्य दिनानिमित्त अरुणाचल प्रदेशातील पूर्व सियांग जिल्ह्यातील सिगर लष्करी तळावर; काल लष्कराच्या 'स्पीयर हेड गनर्स'च्या वतीनं अनेक विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये वृक्षारोपण, व्याख्यानं आदि कार्यक्रमांचा समावेश होता. सिगर लष्करी तळाच्या आजूबाजूच्या गावांमध्ये अनेक शतकांपासून राबवण्यात येणाऱ्या पारंपरिक शेतीच्या प्रकारांना प्रोत्साहन मिळावं, देशी शेतीचं संवर्धन होऊन एकंदरच पर्यावरणाचंही रक्षण व्हावं हा लष्कराने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. पूर्व सियांग जिल्ह्यातील मेबो तालुक्यातल्या विविध गावातले शेतकरी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**एव्हरेस्ट मोहीम**

नेपाळचा सुप्रसिद्ध गिर्यारोहक कामी रिता शेर्पा ह्याने काल हिमालयातील सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर 29 व्या वेळेला सर करत नवा इतिहास रचला आणि स्वतःचाच या आधीचा विक्रम मोडला. 8849 मीटर उंच असणाऱ्या एव्हरेस्ट शिखरावर, 54 वर्षीय कामी रिता शेर्पा याने स्थानिक वेळेनुसार सकाळी 7 वाजून 25 मिनिटांनी हे शिखर, 29 व्या वेळेला पादाक्रांत केलं. सेवनसमिट ट्रेक या संस्थेने ही मोहीम आयोजित केली होती; त्यामध्ये 20 गिर्यारोहकांनी भाग घेतला. अशी माहिती नेपाळ पर्यटन विभागाचे संचालक राकेश गुरूंग यांनी दिली.

**निधन**

तमिळनाडूतील नागपट्टणम इथले कम्युनिस्ट पक्षाचे खासदार एम सेलवारसू यांचं आज सकाळी चेन्नई इथं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते.  ते आतापर्यंत 1989, 1996, 1998 आणि 2019 या लोकसभा निवडणुकीत 4 वेळा खासदार म्हणून निवडून गेले होते. डेल्टा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवण्यात ते नेहमी अग्रभागी होते तसंच या जिल्ह्यात रेल्वे मार्ग आणण्यातही त्यांचा मोठा वाटा होता.

**भूकंप**

मेक्सिको आणि ग्वाटेमालाच्या सीमेदरम्यान 6 पूर्णांक 4 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का काल बसला. कोणतीही हानी झाल्याचं वृत्त लगेच कळू शकलं नाही परंतु या सीमेवरील अनेक डोंगराळ आणि सुदूर भाग दरडीप्रवण आहेत. दोन्ही देशांना विभाजित करणाऱ्या सुशिये नावाच्या नदीकिनारी वसलेल्या त्याच नावाच्या शहरालगत हा भूकंप झाल्याचं अमेरिकी भूगोलशास्त्रीय सर्वेक्षणानं म्हटलं आहे.

**इंडोनेशिया-अफगाणिस्तान-ब्राझील-पूर**

इंडोनेशियाच्या पश्चिम सुमात्रा प्रांतात मुसळधार पावसामुळे पूर आणि भूस्खलन होऊन किमान 28 जणांचा मृत्यू झाला असून 4 जण अजूनही बेपत्ता आहेत. या आपत्तीमुळे प्रभावित झाले असून रस्त्यावरील वाहतूक सुरू करण्यासाठी अनेक मोठी उपकरणं तैनात करण्यात आली आहेत.

शुक्रवारी, अफगाणिस्तानमधील अनेक प्रांतांमध्ये अचानक आलेल्या विनाशकारी पूरामध्ये 315 लोक ठार झाले असून सोळाशे हून अधिक जण जखमी झाले आहेत. अफगाणिस्तानच्या अधिकाऱ्यांनी तिथे आणीबाणी जाहीर केली असून परिस्थिती  आणखी गंभीर होण्याचा इशारा दिला आहे.

ब्राझीलमध्येही, शनिवारी झालेल्या पावसाने आतापर्यंत 136 जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील नद्या ओसंडून वाहू लागल्या, यात 806 जण जखमी आणि 125 जण बेपत्ता झाले आहेत.

पुरामुळे बाधित झालेल्या 20 लाखांहून अधिक लोकांपैकी 5 लाख 37 हजारांहून अधिक जण बेघर झाले असून 81 हजार छावण्यांमध्ये त्यांना आश्रय देण्यात आला आहे. पुरामुळे 92 हजारांहून अधिक घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं; तर अनेक घरं नष्ट झाली. संयुक्त राष्ट्रांचे तज्ज्ञ आणि ब्राझील सरकार यांनी हवामान बदल आणि एल निनो परिणाम या जल-प्रलयासाठी जबाबदार असल्याचं म्हटलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.